दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

वर्ष : ०१ ले ✻ अंक : १७ ✻ जालना ✻ ✻ मंगळवार १८ ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻


परतूर ते शंभू महादेव भव्य कावड यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या यात्रेत दैनिक चकमक चे संपादक शामसुंदर चितोडा आपल्या परिवारासह सहभागी झाले होते.

# परतूर ते शंभू महादेव भव्य कावड यात्रा उत्साहात संपन्न

## गोदावरी गंगेचे पवित्र जल घेऊन शेकडो भाविकांचा सहभाग; शंभू महादेवाचा जलाभिषेक

परतूर । प्रतिनिधी : श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त परतूर शहरातून शंभू महादेव मंदिरापर्यंत आयोजित करण्यात आलेली भव्य कावड यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. सोमवारी, दिनांक १७ रोजी सकाळी सात वाजता छत्रपती राजे संभाजी उड्डाणपूल येथून या कावड यात्रेला प्रारंभ झाला. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या कावड यात्रेपूर्वी कावडधारी भाविकांनी रविवारी, दिनांक १६ रोजी सायंकाळी गोळेगाव येथून गोदावरी गंगेचे पवित्र जल कावडीमध्ये घेतले. गोळेगाव येथून आष्टी, सृष्टी, दैठणा मार्गे प्रवास करत कावडधारी भाविक सकाळी परतूर शहरात दाखल झाले. त्यानंतर छत्रपती राजे संभाजी उड्डाणपूल येथून विधिवत कावड यात्रेला सुरुवात करण्यात आली. या यात्रेत शहरातील तसेच परिसरातील शेकडो भाविक सहभागी झाले होते. विशेषतः माता-भगिनींनी डोक्यावर कलश घेऊन मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यात्रेला भव्य स्वरूप प्राप्त झाले. डीजेच्या तालावर आणि 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषात कावड यात्रा मार्गस्थ झाली. परतूर शहरातून निघालेली ही कावड



यात्रा रोहिणा, वाटूर, यदलापूर, पांगरी मार्गे शंभू महादेवाच्या दिशेने रवाना झाली. मार्गावर अनेक ठिकाणी भाविकांचे स्वागत करण्यात आले. तर बऱ्याच ठिकाणी कावड यात्रेच्या मार्गामध्ये भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते दुपारी सुमारे चार वाजता कावड यात्रा शंभू महादेव मंदिर परिसरात पोहोचली. शंभू महादेव मंदिरात पोहोचल्यानंतर गोळेगाव येथून आणलेल्या गोदावरी गंगेच्या पवित्र जलाने भगवान शंभू महादेवाचा विधिवत जलाभिषेक करण्यात आला. यावेळी उपस्थित भाविकांनी महादेवाचे दर्शन घेत भक्तिभावाने पूजा-अर्चा केली. जलाभिषेकाच्या वेळी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

कावड यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांसाठी आयोजकांच्या वतीने भोजन व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. प्रसाद ग्रहण केल्यानंतर भाविकांनी समाधान व्यक्त केले. धार्मिक श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडविणारी ही कावड यात्रा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. ही कावड यात्रा शहरातील सर्व हिंदू बांधवांनी एकत्र येऊन आयोजित करण्यात आली होती.

# गावठी पिस्तूल बाळगणारा आरोपी जेरबंद

## ८० हजार रुपये किमतीचे दोन गावठी पिस्तूल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी : जालना शहरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका तरुणाला दोन गावठी पिस्तुलांसह जेरबंद केले. या कारवाईत सुमारे ८० हजार रुपये किमतीचे दोन गावठी बनावटीचे पिस्तूल जप्त करण्यात आले. जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेजवीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाकडून अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यात येत होते.

सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार सुमित ऊर्फ गोल्या राजू भुरे (वय २५, रा. कानडी वस्ती, जालना) हा दोन गावठी पिस्तूल बाळगून रेणुकागाव परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेतला असता तो क्लास सिड्स बीएआरएसएस फार्मसमोरील रोडवर, रेणुकागाव रोड, जालना येथे मिळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात



घेत झडती घेतली असता त्याच्याकडून दोन गावठी पिस्तूल जप्त करण्यात आले.

जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांची अंदाजे किंमत ८० हजार रुपये आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध तालुका पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजवीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव तसेच पोलीस अंमलदार सचिन खामगळ, राजेंद्र वाघ, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाबिकर, दत्ता वाघुंडे, देविदास भोजने, आकाश धांडे, बाबा गायकवाड आदींनी केली.

# सहाय्यक पोलीस आयुक्त सुभाष भुजंग यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक

## स्वतंत्र सैनिक पाल्य समितीकडून सत्कार



जालन/प्रतिनिधी : छत्रपती संभाजी नगर येथील सहाय्यक पोलीस आयुक्त श्री सुभाष नानासाहेब भुजंग यांना २०२६ यावर्षी एकाच वेळी व उल्लेखनी सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक आणि केंद्रीय गृहमंत्रालयाचा अतिउत्कृष्ट सेवा पदक अशा दुहेरी सन्मानाने गौरविण्यात येत आहे. १९९२ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून रुजू झालेले सुभाष भुजंग यांना २०१८ मध्ये पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह २०२० मध्ये गुणवंतापूर्वक सेवेसाठी राष्ट्रपती पदक प्राप्त झाले होते त्यांना लवकरच महाराष्ट्राचे राज्यपाल व मान्यवरांचे हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.मुळ गाव किनोळा तालुका बदनापूर येथील रहिवाशी पोलीस उपायुक्त श्री सुभाष भुजंग यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक पुरस्कार मिळाल्याबद्दल यांचा स्वतंत्र सैनिक पाल्य समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांच्या वतीने शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

# बाजार पोलीस चौक ते मुजाहिद चौक परिसरातील अतिक्रमणावर मनपाची कारवाई

जालना/प्रतिनिधी : जालना शहर महानगरपालिका प्रशासनामार्फत अनधिकृत अतिक्रमण हटाव मोहिमेला सातत्याने गती देण्यात येत असून, मा. आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ व वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे अतिक्रमण हटविण्याच्या अनुषंगाने महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आज दि. १७.०८.२०२६ रोजी बाजार चौक ते मिलन चौक या मार्गावर विशेष कारवाई करण्यात आली.

सदर कारवाईदरम्यान एकूण १२ अतिक्रमणे व ५ टपऱ्या आढळून आल्या असून



पैकी ३ टपऱ्या संबंधितांवर नियमानुसार प्रत्येक ठिकाणासाठी रु. ५,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात आला असून २ टपऱ्या जप्ती करण्यात आली.

या कारवाईमुळे परिसरातील रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त करून नागरिकांची ये-जा तसेच वाहतूक सुरळीत करण्यास मदत झाली आहे. महानगरपालिकेच्या वतीने नागरिक व व्यावसायिकांना आवाहन करण्यात येते की, सार्वजनिक रस्ते, पदपथ व शासकीय जागेवर अनधिकृतपणे अतिक्रमण करू नये. तसेच अनधिकृत टपऱ्या अथवा हातगाड्या लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमानुसार दंडात्मक व अतिक्रमण हटावाची कारवाई करण्यात येईल.

ही कारवाई सहाय्यक आयुक्त श्री. विजय फुलंब्रीकर यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी अतिक्रमण विभाग प्रमुख श्री. शोएब खान, स्वच्छता विभाग प्रमुख श्री. सुधीर डहाळे, अतिक्रमण विभागातील इतर कर्मचारी तसेच महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, ज्या ठिकाणी अतिक्रमण हटविण्यात आले आहे, त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी झालेल्या खर्चाची वसुलीही संबंधित अतिक्रमणधारकांकडून करण्यात येईल.

जालना शहरातील सर्व प्रमुख मार्गांवरील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्याची मोहीम यापुढेही सातत्याने व प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाने कळविले आहे.

# मुख्यमंत्री जालना शहर विकास व जनसेवा अभियान सुरू करावे : करण जाधव



जालना (प्रतिनिधी): मराठवाड्यातील महत्त्वाचे औद्योगिक, व्यापारी आणि ऐतिहासिक शहर असलेल्या जालना शहराची वाढती लोकसंख्या, विस्तार पाहता पाणीपुरवठा, भुयारी गटार, पावसाळ्यातील पाणी निचरा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा, यावर मोठा ताण पडत असून पायाभूत सुविधा तात्पुरत्या स्वरूपात न पुरविता, आगामी पंधरा ते वीस वर्षांचा विचार करून जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून देत सामाजिक कार्यकर्त्यांना जनकल्याणच्या योजनांशी जोडण्याकरिता मुख्यमंत्री जालना शहर विकास व जनसेवा अभियान सुरू करावे अशी मागणी छावा मराठा संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष करण जाधव पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. जालना शहराच्या दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्र्यांची करण जाधव पाटील यांनी भेट घेऊन शहरातील नागरी समस्या तसेच सर्वांगीण विकासाबाबत मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. दिलेल्या लेखी निवेदनात स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक व सुविधांचा एकत्रित विकास आराखडा मंजूर करावा, शहरवासीयांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी सर्वेक्षण करून जलकुंभ, जुनी पाईपलाईन, पंपिंग व वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करावे, पावसाळ्यात नाल्यांचे घाण पाणी तुंबू नये यासाठी वैज्ञानिक सर्वेक्षण करून कायमस्वरूपी निचरा व्यवस्था करावी, शहरातील प्रमुख रस्त्यांचे सिमेंटीकरण ,डांबरीकरण, फुटपाथ ,पथदिवे, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षित पादचारी मार्गासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करावा, स्वतंत्र औद्योगिक पायाभूत सुविधा पॅकेज मंजूर करावे, जिल्हा शासकीय रुग्णालय, स्त्री व बाल रुग्णालयात आवश्यक सुविधांचा आढावा घेऊन सुधारणा कराव्यात, मुख्यमंत्री सामाजिक कार्यकर्ता जनसेवा अभियान, प्रत्येक तालुक्यात सामाजिक कार्यकर्ता समन्वयक केंद्र, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण व प्रमाणपत्र योजना सुरू करण्यात यावी, उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना मुख्यमंत्री जनसेवा पुरस्कार द्यावेत, तसेच आगामी ९० दिवसात सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन जालना शहर विकासाचा एकात्मिक कृती आराखडा तयार करण्याचे आदेश द्यावेत अशा मागण्या करण जाधव पाटील यांनी केल्या.

## ब्राह्मण सभा भवन येथे ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न

जालना : ब्राह्मण सभा भवन येथे अँड.सुरेश कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. सभेचे अध्यक्ष रमेश देहेडकर, सचिव आर आर जोशी, सभेचे मार्गदर्शक अँड.बळवंत नाईक, एस. एन.कुलकर्णी, सुनिल जोशी,डॉ.प्रकाश सिगेदार, यशवंत बदनापूरकर, रविंद्र देहेडकर, रविंद्र देशपांडे, डॉ. संजय रुईखेडकर, डॉ.सुयोग कुलकर्णी, अँड.देशमाने, डॉ. पौर्णिमा रुईखेडकर, रसना देहेडकर, डॉ. सुनीला कांडलोकर, सुनील वसंतराव कुलकर्णी, छाया पाटील, मुकुंद कुलकर्णी, विश्वंभर कुलकर्णी,एम. दासखेडकर मामा, डॉ. सुरेंद्र कोयाळकर, डॉ. ऋषिकेश दीक्षित,सुनील देशपांडे,,रूपाली पारनेरकर आदी उपस्थित होते.

# रांजणी ग्रामपंचायत कार्यालयात उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव

जालना/प्रतिनिधी : घनसांवगी तालुक्यातील रांजणी येथील ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच अमोल देशमुख यांचे उपस्थितीत निवडणूक आयोगाच्या एस आय आर मोहिमेत उत्कृष्ट कार्याबद्दल स्थानिक बि एल ओ यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच शेख रहीम, केंद्र प्रमुख रंजित डोळझाके,ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी चेके,पर्यवेक्षक मारोती पाटोळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवृत्त मुख्याध्यापक



विजयकुमार खुळे यांनी केले. यावेळी बि एल ओ व सहाय्यक यांचा मान्यवरांचे हस्ते शाल स्मृतिचिन्हे, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.यात रामा कोमटवार, वंदना कपाळे,प्रिया मांडवे,अनिस सय्यद, मुनाफ कुरेशी,नवाज शेख यांचेसह सहाय्यक अन्नासाहेब देशमुख, सुमय्या पठाण, अर्चना चव्हाण, पुजा ठाकुर, पोलीस पाटील पांडुरंग मांडवे,सहदेव लगामे,नेहाल अन्सारी यांचा सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे जिल्ह्यात अंगणवाडी सेविका वंदना कपाळे व प्रिया मांडवे यांनी जनगणनेत सुध्दा उत्कृष्ट काम केल्याचे केंद्र प्रमुख रंजित डोळझाके यांनी सांगीतले.

शालेय व्यवस्थापण समिती पदाधिकाऱ्यांचा सत्कार

ग्रामपंचायत कार्यालयात जि.प.प्राथमिक शाळा रांजणी व जि.प.प्राथमिक शाळा रांजणी तांडा येथील समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य कैलास वरखडे, दगडू भालेकर,सुदाम पवार, ज्ञानेश्वर शिंगणे,इरफान कुरेशी, सिकंदर शेख, रशिद शेख, विजयकुमार खुळे,संजय मांडवे यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.



श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी जालना शहरातील पंचमुखी महादेव मंदिरात महिल्यांनी बेलीची पाने वाहून मनोभावाने पुजा केली. शिवाय श्रावण महिन्यातील पहिला नागपंचमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.

छायाचित्र : किरण खानापुरे

# उत्तर प्रदेश हादरले! प्रेयसीच्या वाढदिवसाचा केक कापला अन् प्रियकराने मित्रांसोबत मिळून रचला भयानक खेळ



उत्तर प्रदेश : विश्वासाला काळिमा फासणारी आणि मन सुन्न करणारी एक धक्कादायक घटना उत्तर प्रदेशातील (र्णींरी झीरवशीह) लखीमपूर खेरी येथून समोर आली आहे. ज्या प्रियकरावर डोळे झाकून विश्वास ठेवला, त्यानेच मित्रांसोबत मिळून आपल्या प्रेयसीचे आयुष्य उद्ध्वस्त केल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. १५ ऑगस्ट रोजी वाढदिवस साजरा करण्याच्या बहाण्याने घरी बोलावून एका २० वर्षीय तरुणीवर तिच्या प्रियकराने आणि त्याच्या दोन मित्रांनी सामूहिक बलात्कार केला. याप्रकरणी पोलिसांनी तत्परता दाखवत अवघ्या २४ तासांत मुख्य आरोपी प्रियकरासह तिन्ही नराधमांच्या आवळल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मूळची सीतापूर येथील रहिवासी असलेली पीडित तरुणी लखीमपूर येथील तिच्या आजीच्या घरी राहण्यासाठी आली होती. १५ ऑगस्ट रोजी तिचा वाढदिवस असल्याने, शेजारीच राहणारा तिचा प्रियकर सिद्धार्थ श्रीवास्तव याने तिला वाढदिवस साजरा करण्यासाठी आपल्या घरी बोलावले. पीडिता त्याच्या घरी पोहोचली असता, तिथे सिद्धार्थचे दोन मित्र – मधुरेश मिश्रा आणि विष्णू कनौजिया हे आधीपासूनच हजर होते. सुरुवातीला सर्वांनी मिळून अतिशय आनंदाने वाढदिवसाचा केक कापला. मात्र, त्यानंतर आरोपींचे खरे रूप समोर आले. केक कापल्यानंतर सिद्धार्थ आणि त्याच्या दोन्ही मित्रांनी आळीपाळीने तरुणीवर अत्याचार केले. या अमानुष कृत्यानंतर पीडितेला रक्तबंबाळ आणि अत्यंत गंभीर अवस्थेत खोलीत सोडून तिन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

किंकाळ्या ऐकून नागरिक धावले; पोलिसांची धडक कारवाई

पीडित तरुणीच्या वेदनादायी किंकाळ्या ऐकून शेजाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तात्काळ पोलिसांना या घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच सदर कोतवाली पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पीडितेला तात्काळ उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले. लखीमपूर शहर पोलीस आयुक्त विवेक तिवारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला आणि आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना केली. १६ ऑगस्ट रोजी रात्री पोलिसांनी मुख्य आरोपी सिद्धार्थ श्रीवास्तव, मधुरेश मिश्रा आणि विष्णू कनौजिया या तिघांनाही बेड्या ठोकल्या. याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# चर्चगेट स्टेशनजवळ आयकर भवनला आग, परिसरात धुराचे लोट



मुंबई : मुंबईतून एक मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. चर्चगेट स्टेशनजवळील आयकर विभागाच्या कार्यालयाला सोमवारी दुपारी भीषण आग लागली. आग लागल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आगीची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाच्या सुमारे ८ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. अग्निशमन दलाचे जवान आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. आगीचे स्वरूप मोठे असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

तळमजल्यावर लागली आग?

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, चर्चगेट स्टेशनजवळ असलेल्या आयकर विभागाच्या कार्यालयाच्या तळमजल्यावर आग लागली. सुरुवातीला आगीचे कारण स्पष्ट झाले नव्हते. मात्र, प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अधिकृत तपासानंतरच आगीचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. आग लागल्यानंतर काही वेळातच कार्यालयातून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडू लागला. बघता बघता धुराचे लोट परिसरात पसरल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेर काढले : आग लागली त्यावेळी आयकर विभागाच्या कार्यालयात काही कर्मचारी उपस्थित होते. आगीची माहिती मिळताच त्यांना तातडीने कार्यालयाबाहेर काढण्यात आले. त्यामुळे काही काळ परिसरात धावपळ उडाली. दरम्यान, कार्यालयात आणखी कोणी अडकले आहे का, याचा शोध अग्निशमन दलाकडून घेतला जात आहे. अग्निशमन दलाच्या जवानांकडून कार्यालयाच्या विविध भागांची तपासणी करण्यात येत असून आग पूर्णपणे नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत मोठी दुर्घटना टळली कर्मचाऱ्यांना वेळीच बाहेर काढण्यात आल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या आगीत कार्यालयातील महत्त्वाची कागदपत्रे, फर्निचर किंवा इतर साहित्याचे किती नुकसान झाले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सध्या अग्निशमन दलाचे जवान आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्नशील असून, आग पूर्णपणे विझल्यानंतरच परिस्थिती अधिक स्पष्ट होणार आहे.

# नोएल टाटा यांनी घेतली अमित शहा आणि पंतप्रधान कार्यालयाच्या अधिकाऱ्याची भेट



नवी दिल्ली : एन. चंद्रशेखरन यांनी २०२७ मध्ये टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून पायउतार होण्याच्या घेतलेल्या निर्णयाच्या आणि सर रतन टाटा ट्रस्टमधील सुरू असलेल्या कायदेशीर अडचणींच्या पार्श्वभूमीवर, टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. टाटा समूहातील संचालक मंडळातील उत्तराधिकार आणि प्रशासकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाली आहे. टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी शनिवारी दुपारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान कार्यालयातील एका प्रमुख अधिकाऱ्याची भेट घेतली, अशी माहिती या घडामोडींची जाण असलेल्या व्यक्तींनी दिली.

सदिच्छा भेट

म्हणून मानली जाणारी ही भेट, टाटा समूहातील अंतर्गत अशांततेच्या काळात होत आहे. ट्रस्ट्समधील अंतर्गत संघर्ष आणि त्यांच्या आतील व बाहेरील लोकांकडून होत असलेल्या प्रशासकीय त्रुटींच्या आरोपांशी हा समूह झुंज देत आहे. त्यातच टाटा समूहाला गेल्या बुधवारी सर्वात मोठा धक्का बसला, जेव्हा टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी संचालक मंडळाला पत्र लिहून कळवले की, २० फेब्रुवारी २०२७ रोजी त्यांचा सध्याचा कार्यकाळ संपल्यावर ते पुनर्नियुक्तीसाठी स्वतःचा विचार केला जावा म्हणून अर्ज करणार नाहीत. या घटनेच्या एका दिवसानंतर, सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या संचालक मंडळाची बैठक पार पडली. यामध्ये टाटा सन्सच्या नियमावलीनुसार चंद्रशेखरन यांच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी निवड समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून, अवयव प्रत्यारोपणासाठी ७९५ रुग्णांना १५.७३ कोटींची मदत

मुंबई : यकृत, मूत्रपिंड, फुप्फुस, हृदय आदी अवयव निकामी झाल्यानंतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हाच रुग्णांसाठी शेवटचा पर्याय ठरतो. मात्र, या उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे करतो. या अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी राज्यातील गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरत असून, आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ७९८ रुग्णांना १५ कोटी ७९ लाख ६६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होत आहेत. त्यामुळे किडनी, यकृत, हृदय आणि फुप्फुस निकामी झालेल्या अनेक रुग्णांसाठी उपचाराची नवी आशा निर्माण झाली आहे. मात्र, अशा शस्त्रक्रियांसाठी खाजगी रुग्णालयात लाखो रुपयांचा खर्च येत असल्याने अनेक गरजू रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.अशा कठीण परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून, त्यांच्या कुटुंबांनाही मोठा दिलासा मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रुग्णकेंद्रित करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू करण्यात आली आहे. या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय मदत अधिक वेगाने उपलब्ध होत आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठीचा अर्ज आता रुग्णाऐवजी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयामार्फत थेट सादर केला जात आहे. त्यामुळे रुग्णांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता राहिली नाही. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अर्ज मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण होत असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांना गती मिळणार आहे.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत : १५.७९ कोटींची मदत

मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रुग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रुपयांची मदत देण्यात आली. यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना ३ कोटी २१ लाख ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. फुप्फुस प्रत्यारोपणासाठी 03 रूग्णांना ६ लाख रूपयांची मदत देण्यात आली. तर, हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रुग्णांना २८ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर उपचारांसाठी लागणारा




वेळ कमी करणे, अर्ज प्रक्रियेतील अडथळे दूर करणे आणि गरजू रुग्णांना तातडीने मदत,अवयव प्रत्यारोपणासारख्या खर्चिक उपचारांसाठी आर्थिक मदत वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान, अद्यावत करण्यात आली आहे. गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# हवे हिरवे छत्र

असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच–त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.

भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरू, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच 'विकास' आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.

मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष–प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे.




मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का?

सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे.

जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८०–वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष–प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे. अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे. यावर कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. अशी शहरे जिथे शतावर्षीय वटवृक्ष शाळेसाठी अडथळा नसतो, तर ती सर्वात मौल्यवान संपत्ती असते. शहरे वाढत राहणार आहेत. पण ती वाढ झाडांच्या विरोधात नसून त्यांच्या सहजीवनातून व्हायला हवी. 'वाढती शहरे, हिरवे छत्र' ही केवळ घोषणा नाही; ती भविष्यातील शहरांची रचना आहे. अशी शहरे जिथे पायाभूत सुविधा प्रकल्पांचा पहिला प्रश्न कोणती झाडे काढायची? असा नसून कोणती झाडे वाचवता येतील? असा असेल. मुंबई या बदलाचे नेतृत्व करू शकते आणि करायलाच हवे.

पान ४ वरून..

## रोटरी क्लब मिडटाऊनतर्फे

प्रारंभी क्लबचे अध्यक्ष आलोक नानावटी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायण जाधव, सरपंच ज्ञानेश्वर राठोड, उपसरपंच राधिका जाधव, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे सचिव मनमोहन भक्कड, सुरज गेही, प्रशांत बागडी, अमित शाह, पियुष अग्रवाल, पंकज अग्रवाल, अमोल जिंदल, मनोज अग्रवाल यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक संतोष नागवडे यांनी केले. शिक्षणासाठी मिळालेल्या नव्या सुविधांमुळे मानेगाव खालसा येथील स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

# यंदाचा 'गणेशोत्सव' युनेस्कोच्या पटलावर येणार ; महायुती सरकारची तयारी

मुंबई : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा आत्मा असलेल्या गणेशोत्सवाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. गणेशोत्सवाचा समावेश युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत करण्यासाठी प्रशासनाने व्यापक हालचाली सुरू केल्या असून, राज्यातील सर्व मंत्रालयीन विभागांना गणेशोत्सवाच्या अनुषंगाने ५० हून अधिक विविध उपक्रम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गेल्या वर्षी गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून दर्जा देण्यात आला होता. यंदा हा उत्सव अधिक व्यापक, सर्वसमावेशक आणि जागतिक दर्जाचा करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीनंतर ही सविस्तर नियमावली जाहीर करण्यात आली आहे. गणेशोत्सवाचा प्रसार देशासह जगभरात व्हावा यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे विशेष योजना आखण्यात आली असून, महाराष्ट्राबाहेरील १० राज्यांमध्ये आणि परदेशात एका देशात गणेशोत्सवानिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. याशिवाय नवी दिल्लीत ५ दिवसांचे तर मुंबईत ८



दिवसांचे भव्य सांस्कृतिक कार्यक्रम रंगणार असून राज्यातील प्रमुख मंदिरे व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ऑनलाईन दर्शनासाठी स्वतंत्र पोर्टल तसेच घरगुती गणपतींच्या चित्रांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित केला जाणार आहे. दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या माध्यमातून राज्यभर गणेशोत्सवावर आधारित रील्स स्पर्धेचेही आयोजन केले जाईल.

पर्यावरणपूरक आणि आदर्श गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतर्फे तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून, राज्यातील सुमारे ४८० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना एकूण १.५० कोटी रुपयांची पारितोषिके दिली जातील. या महोत्सवात सर्वच मंत्रालयीन विभागांचा सहभाग निश्चित करण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभाग शाळांमध्ये शाडूच्या मूर्ती बनवण्याच्या कार्यशाळा घेईल, तर उच्च शिक्षण विभागामार्फत महाविद्यालयांमध्ये 'गणेश आणि विज्ञान' या विषयावर परिसंवाद व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांमार्फत रोबोटिक्स देखाव्यांचे सादरीकरण केले जाईल.

## मोहम्मद शफीक यांच्या पुढाकारातून शिक्षकांचा सत्कार; विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




परतूर । प्रतिनिधी : परतूर शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष मोहम्मद शफीक यांच्या वतीने इंदिरानगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. एसआयआरचे काम उत्कृष्ट पद्धतीने केल्याबद्दल मो. इकबाल सर, कानपुडे सर आणि मो. रफिक सर यांचा मोहम्मद शफीक यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी स्वातंत्र्यदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचेही वाटप करण्यात आले. शिक्षण क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण करण्यासाठी मोहम्मद शफीक यांनी हा उपक्रम राबविला. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्राधान्य देणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार मोहम्मद शफीक यांनी व्यक्त केला. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी आणि शिक्षकांनी कौतुक केले. या कार्यक्रमाला नगरसेवक खदीर कुरेशी, समीर शेख, अली शेख, फिरोज शेख, मुन्ना शेख, हप्पू खतीब, इमरान सय्यद, अजहर शेख, मुशर्रफ शेख आणि मञ्जू शेख, जावेद शहा यांच्यासह दिलदार पठाण आदींची उपस्थिती होती.

## न्यू वंडर इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये स्वतंत्र दिवस उत्साहात साजरा

परतूर/प्रतिनिधी : न्यू वंडर इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज परतुर मध्ये स्वतंत्र दिवस उत्साहात साजरा. स्वतंत्र दिनानिमित्त शाळेमध्ये कवायत, लेझीम नृत्य,आणि परेड अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद घेतला. शाळेच्या प्रिन्सिपल श्रीमती पूजा मोरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना स्वतंत्र दिनाचे महत्त्व सांगितले, शिक्षकांमध्ये श्री संतोष हरकल ,श्री महादेव कदम तसेच काही विद्यार्थ्यांनी इंग्लिश हिंदी



आणि मराठी भाषेमध्ये भाषणे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री सय्यद सर तसेच आभार प्रदर्शन श्रीमती शालू पारखे यांनी केले .कार्यक्रमा दरम्यान संस्थेचे अध्यक्ष श्री नारायण दादा सोळंके, आई पार्वतीबाई सोळंके संस्थेच्या सचिव श्रीमती छाया बागल , प्रिन्सिपल श्रीमती पूजा मोरे, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जे.के कलेक्शन चे श्री सुनिल कासट , प्रा.श्री सिद्धार्थ पानवाले,संजय गाडगे, विद्यार्थ्यांचे पालक सर्व शिक्षकवृंद व इतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याविरोधात जालन्यात मराठा क्रांती मोर्चा आक्रमक

जालना : ओबीसी समाजाचे नेते नवनाथ वाघमारे यांनी पुणे येथे मराठा समाजाच्या महिलेबद्दल कथितरित्या अपशब्दाचा वापर केल्याचा आरोप करत जालन्यात मराठा क्रांती मोर्चा आक्रमक बनला असून, त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी सोमवार दि. १७ ऑगस्ट रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान, पदाधिकाऱ्यांच्या भावना लक्षात घेत उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांना सूचना सूचना केल्यानंतर मराठा मोर्चा समन्वयक व संभाजी ब्रिगेड महीला आघाडीच्या जालना शहराध्यक्षा सुवर्णाताई वाघ (राऊत) यांच्या तक्रारीवरून नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध भादंवि ७९, १९६(१), ३५३ (२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने ड. शैलेश देशमुख हे कायदेशीर भूमिका मांडत आहेत.

यावेळी आंदोलकांनी नवनाथ वाघमारे यांच्या वक्तव्याचा निषेध करत संबंधित प्रकरणाची चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे अशोक पडुळ, संतोष गाजरे, संदीप ताडगे, विश्वंभर तिरुखे, प्रशांत वाडेकर, नगरसेवक महेश निकम, ड. शैलेश देशमुख, गणेश शिंदे, प्रल्हाद शिरसाट, संध्याताई देठे, सुवर्णाताई वाघ, नीता वझरकर, सीमाताई काकडे, शरद मांगधरे, योगेश शिंदे, विकास शिंदे, शरद शिंदे, भरत मानकर, परमेश्वर सपकाळ, गजानन देशमुख, पंकज बागल, विलास भालेकर, बाबा राऊत, सचिन नाईकवाडे, योगेश पाटील, पांडू पवार, श्रीकांत पवार, गणेश थोरात, नीता वझरकर, धनंजय पोहेकर, बाळासाहेब बरसाले यांच्यासह मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





नागपंचमीनिमित्त महिला भगिनींनी नागाची पूजा व वारुळाची पूजा करतानामहिला भगिनी दिसत आहे. **छाया/ किरण खानापुरे**

## कोठारी स्कूलची शिस्त व संस्कार कौतुकास्पद:आ.अर्जुनराव खोतकर

जालना/प्रतिनिधी : कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलची कोठारी स्कूलची शिस्त आणि संस्कार कौतुकास्पद आहेत, असे गौरवोद्गार माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना काढले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, मेहनत, संस्कार आणि देशप्रेम अंगीकारून देशाचे जबाबदार नागरिक बनावे, असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले.

कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती, उत्साह आणि अत्यंत दिमाखात साजरा करण्यात आला. प्रारंभी आ. खोतकर यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, शिवसेना गटनेते तथा नगरसेवक दीपक राठोड, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड, शाळेचे सचिव प्रसन्नाकुमार कोठारी, संचालिका सौ. तृप्ती बंब-कोठारी आणि प्राचार्य अरुणकुमार पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शाळेच्या संचालिका सौ. तृप्ती बंब-कोठारी म्हणाल्या की, प्रत्येकाने आपली जबाबदारी मनापासून स्वीकारून कठोर परिश्रमाला स्मार्टवर्कची जोड दिली तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. एक टीम, एक विचार आणि एक ध्येय यातूनच यशाची भव्य वाटचाल




घडते.

विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, मनमोहक नृत्ये, स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषेतील सादरीकरणे आणि प्रभावी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. तिरंगी फुगे, आकर्षक सजावट आणि देशभक्तीपर वातावरणाने संपूर्ण शालेय परिसर उजळून निघाला होता. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमातील प्रत्येक उपक्रमातून शिस्त, आत्मविश्वास, संस्कार आणि देशप्रेमाचे सुंदर दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी तीर्था जैन आणि श्रेया बागल यांनी केले तर सृष्टी कोळकर हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रोटरी क्लब मिडटाऊनतर्फे मानेगाव जि. प. शाळेला दहा संगणक व चार सायकल भेट

जालना/प्रतिनिधी : स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनतर्फे मानेगाव खालसा (ता. जालना) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देशप्रेमाची भावना जागृत करण्यासोबतच ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शाळेला इन्व्हर्टरसह दहा संगणक संचाचे लोकार्पण करण्यात येऊन चार मुलींना सायकल भेट देण्यात आल्या.

. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी रोटरी क्लबतर्फे शाळेला १० संगणक संच सुपूर्द करण्यात येऊन




संगणकासाठी आवश्यक शॉर्ट कीज व आवश्यक माहितीचे फ्लेक्स लावण्यात आले. खंडित विजेचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी जम्बो इन्व्हर्टर व बॅटरीची सुविधा देखील क्लबतर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांचे संगणक शिक्षण अधिक प्रभावी होईल, असा विश्वास रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे अध्यक्ष अलोक नानावटी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. ते म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात संगणक ज्ञान विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया अधिक मजबूत होईल.

रोटरी व्हील्स ऑफ खूप बायसिकल फॉर गर्ल्स या प्रांतीय उपक्रमांतर्गत कालिका स्टील अलाईजच्या सहकार्याने ४ विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले सायकली मिळाल्यामुळे विद्यार्थिनींचा शाळेत येण्याचा प्रवास सुलभ होणार आहे.

(पान ३ वर)

## फुलेनगर येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा

भोकरदन : तालुक्यातील हसनाबाद जवळील मौजे फुलेनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रात भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक व व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या प्रसंगी



शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अरुण दाभाडे,सरपंच दिगंबर दाभाडे,मुख्याध्यापक बोचरे सर,सहशिक्षक मतकर सर,अंगणवाडी सेविका गंगासागर फलके/सिनगारे,बुथ क्रमांक ६२ लतिफपुर/फुलेनगर चे प्रमुख शिवाजीराव पाटील शिनगारे,पालक समाधान काकडे,सारंगधर काकडे, अंगणवाडी मदतनीस दाभाडे ताई,विष्णू पाटील सिनगारे,गजानन पाटील शिनगारे व गावातील प्रतिष्ठित नागरिक पालक आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## बारवाले विद्यालयात लायन्स डायमंड तर्फे बक्षीस व खाऊचे वितरण

जालना ( प्रतिनिधी) : मांडवा येथील पद्मभूषण डॉ. बद्रीनारायण बारवाले विद्यालयात ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लॉयन्स क्लब ऑफ जालना डायमंड तर्फे विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण,खाऊचे वाटप करण्यात आले.

प्रारंभी क्लबचे अध्यक्ष शंकर सवादे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष किसनराव सोलाट यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहळ्यास झोन चेअर पर्सन अमोल बांगड,मोहन इंगळे,संतोष दुधानी, संस्था सचिव नंदाताई सोलाट, कोषाध्यक्ष विठ्ठलराव सोलाट, उपाध्यक्ष ज्ञानदेव पाटील चंद,संचालक विठ्ठल सोलाट, विश्वनाथ मिसाळ, बाबासाहेब सोलाट ,बंडू मिसाळ,भगवान सोलाट, सोमनाथ सोलाट, मुख्याध्यापिका अंजली सोलाट ,यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी थोर क्रांतिकारक, महापुरुषांच्या वेशभूषा साकारल्या. देशभक्तीपर गीते, मनोगत व्यक्त करून अभिनय , लेझीमची प्रात्यक्षिके सादर केली. रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धेतील गुणवंतांना बक्षीसे देऊन खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी आकांक्षा सोलाट,पल्लवी कंकाळ ,अमरनाथ सोलाट मोनिका दिकोंडवार सुप्रिया आटोळे योगिता वाहेकर श्रावणी येमुल सुहानी दांडगे सोनाली वैद्य मनीषा शेजवळकर पल्लवी मेहेत्रे बाळू धांडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त शिबिरात २५० जणांचे स्वयंस्फूर्त रक्तदान

जालना / प्रतिनिधी - स्वातंत्र्य दिनानिमित्त मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत-ए-उलेमा जालना, चार्ली ग्रुप जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १५ ऑगस्ट रोजी जमजम हॉस्पिटलमध्ये आयोजित शिबिरात २५० जणांनी स्वयंस्फूर्त रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन जमियत-ए-उलेमाचे महाराष्ट्र अध्यक्ष हाफिज नदीम सिद्दिकी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी खासदार डॉ. कल्याण काळे हे होते, तर विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्राचे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, प्रमुख पाहुणे मुफ्ती अब्दुल रहमान, मुस्तकीम हमदुले, मुफ्ती फईम, जुनेद हमदुले डॉ. आशिष राठोड, मुफ्ती सोहेल, मुफ्ती फारुक, मुफ्ती यूसूफ, बदर चाऊस, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष ड. संजय काळबांडे, विशाल धानुरे, नंदकिशोर जांगडे, मौलाना हसन मिल्ली, हाफिज अजहर, नगरसेवक फारूक तुंडीवाले, आसिफ अन्सारी, सय्यद मजहर, माजेद खान, बोर्डे जी,राजेंद्र जाधव, मोहम्मद माजेद, शेख जावेद,मा नगरसेवक सेवक गणेश राऊत,संदीप नाईकवाडे, कृष्णा पडुळ, विजय कांबळे, अन्वर मिर्झा,आरिफ़ खान,मोहम्मद नजीब, सय्यद अज़हर, शाहआलम खान, हाजी अब्दुल हमीद, अतीक खान, फेरोज़ खान, सलीम हमदुले,शेख फ़ारुख,आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी हाफिज नदीम सिद्दिकी म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त हा उपक्रम राबविणे स्तुत्य आहे.



मुस्तकीम हमदुले फाउंडेशन आणि जमियत- ए- उलेमा-ए-हिंद जालनाचे पदाधिकारी दरवर्षी असे कार्यक्रम घेऊन समाजोपयोगी काम करतात, आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी आहोत. खा. डॉ. कल्याण काळे म्हणाले की, देशात सध्या असलेल्या माहोलमध्ये असे रक्तदान शिबिर घेऊन सर्वधर्मीय बंधुभाव जोपासला जात आहे. शेख शकीलआणि शेख वसीम हे दरवर्षी असा कार्यक्रम ठेवून पूर्ण वर्षभर जे काम करतात, ते कौतुकास्पद आहे. राजेश टोपे म्हणाले की, जिल्ह्यामधून शहरामधून मोठ्या प्रमाणात रुग्ण येतात. त्यांना शेख शकील आणि शेख वसीम हे सर्वतोपरी सहकार्य करतात. एक लोकप्रतिनिधी म्हणून तुमच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शेख वसीम,आणि मुस्तकीम हमदुले फाउंडेशन, जमियत-ए-उलेमा जालना, चार्ली ग्रुपने विशेष परिश्रम घेतले.